Vol 6 Issue 11 Dec 2016

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

Mr. Dikonda Govardhan Krushanahari
Professor and Researcher ,
Rayat shikshan sanstha's, Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur.

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

Indian Streams Research Journal
ISSN: 2230-7850 Impact Factor : 4.1625(UIF) Volume - 6 | Issue - 11 | December - 2016

# मध्ययुगीन चरित्रलेखनाचे स्वरूप आणि उद्दिष्टे

प्रा. डॉ. बाळासाहेब गार्डी
पदव्यूत्तर अध्ययन व संशोधन केंद्र
रा. ब. ना. बोरावके महाविद्यालय, श्रीरामपूर.

*प्रस्तावना:*

प्राचीन मराठी वाङमयाच्या इतिहासात अनेक वैशिष्टयपुर्ण प्रकार आहेत. त्यातील एक महत्त्वाचा साहित्यप्रकार म्हणजे चरित्रलेखन होय. मध्ययुगीन कालखंडात म्हणजे बाराव्या शतकापासून ते महिपतीबुवा ताहराबादकर यांच्या कालखंडापर्यंत म्हणजे अठराव्या शतकापर्यंत चरित्रलेखनाच्या इतिहासाचा अभ्यास करून मराठी चरित्रलेखनाच्या प्रेरणाचा शोध घेतलेला आहे. बाराव्या शतकात मराठीत लेखनाला सुरवात झाली. प्राचीन मराठी लेखनाच्या विविध परंपरांचे मूळ आधार याच काळात निर्माण झाले. या काळातील ग्रंथलेखन परंपरेतील पहिलेच असूनही त्यात विचारांची प्रौढता, बुद्धीची प्रगल्भता व प्रतिभाशक्तीचा विलास आढळून येतो. आरंभकाळातील लेखन महाराष्ट्रात अस्तित्वात असलेल्या नाथ, महानुभाव व वारकरी संप्रदायांच्या आश्रयाने करण्यात आलेले दिसून येते. या संप्रदायाचे तत्त्वज्ञान निर्माण करणे व त्याचा जनसामान्यात प्रसार करणे हे महत्त्वाचे कार्य मानले गेले. याकाळातील कवी, लेखक त्या त्या संप्रदायाचे संत मानले गेले. या संतपुरूषांचे चरित्र सामान्यांना सांगून मार्गदर्शन करण्याची पद्धत नाथ संप्रदायापासूनच सुरू झालेली दिसते. गोरक्षनाथ, मच्छिंद्रनाथ यांच्या चरित्रकथा मौखिक परंपरेने समाजात रूढ झालेल्या दिसतात.

महानुभाव व वारकरी संप्रदायात खया अर्थाने चरित्रलेखनाला प्रेरणा मिळाल्याचे दिसते. गद्य व पद्य अशा दोन्ही माध्यमातून त्यांनी चरित्रलेखन केलेले दिसून येते. दोन्ही पंथांची कार्य पद्धती व तत्त्वज्ञान चरित्रलेखनाला प्रेरक ठरलेली दिसते. दोन्ही संप्रदायातील संतमहंतांचे वैयक्तिक



चारित्र उच्च प्रतीचे होते. त्यांचे विचार व आचार यामध्ये विलक्षण सुसंगती होती. त्यांच्या व्यक्तिमत्वाभोवती एक दिव्यतेचे वलय होते. साहजिकच त्यांच्या जीवन चरित्राविषयी जनसामान्यांमध्ये एक प्रकारचे कुतूहल होते त्यामुळेच चक्रधरस्वामी, गाविंदप्रभू, संत ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम इ. ची चरित्रे कमालीची लोकप्रिय ठरलेली दिसून येतात.

व्यक्तीला किंवा तिच्या तत्त्वज्ञानाला जाणून घेण्यासाठी चरित्रांची निर्मिती झालेली दिसते. चक्रधरांचा विरह ही लीळाचरित्राची प्रेरणा ठरते तर ज्ञानेश्वरांची समाधी ही नामदेवांना चरित्र लिहिण्यास स्फुर्ती देते. प्राचीन मराठीतील या चरित्रग्रंथाची निर्मिती, त्याचे स्वरूप यामध्ये अशा प्रकारची अनेक साम्ये आढळतात. चरित्रात्मक लेखनाच्या निर्मितीला भक्तीमार्गातील काही तत्वांचीही मदत झालेली दिसते. नामस्मरण, वंदन, कीर्तन, ध्यान व आत्मनिवेदन इ. भक्तीची नवविधसाधने चरित्रात्मक लेखनाच्या बाबतीत उपकारक ठरलेली दिसतात. भक्ती ही परमेश्वराला जाणून घेण्याची एक वृत्ती आहे. भक्तीचा विषय झालेली व्यक्ती जाणून घेण्यासाठी तिच्याशी तन्मय होणे व तिचा ध्यास घेणे असे या वृत्तीचे स्वरूप आहे. या वृत्तीची साधना वारकरी व महानुभाव या भक्तीपंथांमध्ये महत्त्वाची मानली गेली आहे. या वृत्तीतूनच प्राचीन मराठी चरित्रात्मक लेखन झाल्याचे दिसून येते.

मराठीतील आद्यचरित्राचा मान महानुभाव संप्रदायातील म्हाइंभट्टांच्या 'लीळाचरित्रा'ला जातो. 'लीळाचरित्रा'चे उद्दिष्ट पंथप्रवर्तकाचे चरित्र उपलब्ध करून देणे व पंथाला तत्त्वज्ञानाची बैठक प्राप्त करून देणे असे असले तरी त्यातून अनेक उद्दिष्टे सफल झालेली दिसतात. या चरित्रामुळेच मराठीत अनेक चरित्रांची निर्मिती झाली. महानुभाव संप्रदायात चक्रधर, गोविंदप्रभू, नागदेवाचार्य इ. ची चरित्रे गद्य व पद्य अशा दोन्ही पद्धतींनी लिहिली गेली. याच दरम्यान वारकरी संप्रदायतही ज्ञानेश्वरांच्या चरित्रापासून नामदेवांनी चरित्र गायला सुरवात केली. चौदाव्या शतकाच्या उत्तरार्धात मात्र मुस्लिम राजवट सुरु झाली आणि चरित्रलेखनाला अनेक प्रकारच्या मर्यादा आलेल्या दिसतात. सोळाव्या शतकात संत एकनाथांनी पुन्हा एकदा आख्यान पद्धतीने चरित्रलेखनाला चालना दिलेली दिसते. याच काळात खिस्ती मिशर्न यांनीही धर्मप्रसाराच्या प्रेरणेतून चरित्रलेखन केल्याचे दिसून येते.

प्राचीन मराठीतील बहुतांश चरित्रे पद्यस्वरूपातच लिहिलेली आढळतात. संतमंडळीचे जीवन समाजासमोर होते. त्यांची भक्ती,तपोबल,अविरत प्रयत्न, नीतिमूल्यांचे संरक्षण आणि त्याच्या अंमलबजावणीसाठी आवाहन, प्रसंगी त्यासाठी संपूर्ण त्याग करण्याची वृत्ती या साया गोष्टी समाजासमोर होत्या. संतांबद्दलच्या आदराने, जिव्हाळयाने त्यांनी केलेल्या चमत्काराने दिपून जाऊन आणि दिलेल्या उपदेशाने भारून जाऊन त्यांच्या सोज्वळ आणि पवित्र जीवनाचे गुणगान त्यांच्या संप्रदायातील इतर कवींनी आणि शिष्यांनी करणे अगदी स्वाभाविक होते. प्राचीन मराठीतील चरित्रांचा जन्म असा झालेला दिसून येतो. चरित्रनायकाबद्दलच्या अनन्यभावाने आणि श्रद्धेने ही चरित्रे लिहिली गेल्यामुळे त्यात चौकसपणापेक्षा भाविकपणाच अधिक आलेला दिसतो. केवळ ऐतिहासिक सत्याला प्रमाण मानून चरित्रलेखन करण्यापेक्षा आदरणीय व्यक्तीचे गुणगान हीच भुमिका त्यात अधिक दिसते.

प्राचीन मराठीतील चरित्रलेखनाच्या प्रेरणा व स्वरूप आत्मसात करीतच महिपतीबुवांनी चरित्रलेखनाला सुरवात केल्याचे दिसून येते. चरित्रलेखन ही संतसेवा व हरिसेवा मानूनच त्यांनी मराठीतील सर्वाधिक लेखन केले. सर्व सामान्यांच्या मनात भक्तिभावनेचा उदय होण्यासाठी संतकथांचे आदर्श त्यांच्यासमोर ठेवावेत या प्रेरणेतूनच त्यांनी चरित्रलेखन केलेले दिसून येते. महिपतीबुवांच्या दृष्टिने चरित्रलेखन करणे म्हणजे गुणसंकीर्तन आहे. एखादयाचे चरित्र गाणे म्हणजेच त्याचा गौरव करणे अशी त्यांची भूमिका आहे. संतांची चरित्रे वर्णन करणे हाच आपला जीवन हेतू आहे हे त्यांच्या

न लगे भुक्ती न लगे मुक्ती | मागत नाही धनसंपत्ती
तुझ्या दासांची वर्णीन किर्ती | ऐसे श्रीपती करावे ||

या 'भक्तलीलामृता'तील वचनावरून लक्षात येते . महिपतीबुवांनी एकूण **284** संतांची चरित्रे लिहिलेली आहेत . यावरूनच त्यांची चरित्रलेखनाची ओढ दिसून येते . महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेरील अशा अनेक भक्त व संतांची ही चरित्रे म्हणजे एक चरित्रमालाच आहे . यात काही संतांची चरित्रे अतिशय विस्तृत आलेली आहेत तर काही अतिशय त्रोटकही आलेली आहेत . जशी माहिती उपलब्ध होईल त्याप्रमाणे हे लेखन झालेले असल्याने काही संतांची चरित्रे पुन्हा पुन्हा आलेली आहेत . चरित्रलेखनाबरोबरच महिपतीबुवांनी 'कथासारामृत' हा पौराणिक कथा सांगणारा विस्तृत ग्रंथ लिहिलेला आहे . तसेच 'अनंत चतुर्दशी व्रतकथा', 'अपराध निवेदन स्तोत्र', 'ऋषिपंचमी कथा', 'आरती संत मंडळीची', 'गणेशपुराण','तुळशीमाहात्म्य', 'दत्तजन्म', 'देहकांड पुराण', 'पंढरीमाहात्म्य', 'पांडुरंग माहात्म्य' , ' मुक्ताभरणव्रतकथा', 'शनिमाहात्म्य', 'सारांश ज्ञानेश्वरी', याशिवाय अभंग व स्फुट पदे सुमारे **47000** इतकी रचनाही केलेली आहे .

महिपतीबुवा ताहराबादकर यांचे साहित्य असे वैविध्यपूर्ण आहे . महिपती हे संतचरित्र गाणारे संतकवी म्हणून लोकप्रिय आहेत . राजाचा जसा राजकवी तसा संतांचा संतकवी म्हणून ते ओळखले जातात . संतकथा गाणे म्हणजेच परमेश्वराची भक्ती करणे व आदर्श भक्तांची भक्ती गाणे म्हणजेच भक्ती करणे या प्रेरणेतूनच हे लेखन झाल्याचे दिसून येते . या संतचरित्राच्या रूपाने त्यांनी समाजाला नीतीचा व भक्तीचा आदर्श दाखविण्याचा प्रयत्न केला . महाराष्ट्रात गावोगाव या ग्रंथांचे आजही अत्यंत भक्तीभावाने वाचन आणि श्रवण केले जाते .

संदर्भग्रंथ :

**1** . गणोरकर प्रभा व इतर (संपादक), 'वाङ्मयीन संज्ञाकोश', **2001**, पृ . **209**
**2** . बोरगावकर व . रा ., 'प्राचीन मराठीतील चरित्रलेखन', कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे **1978**, पृ . **54**
**3** . नसीराबादकर ल . रा ., 'प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास', फडके प्रकाशन कोल्हापूर**1994** पृ . **116**
**5** . देवळे श . रा, 'भक्तविजय', आदर्श विद्यार्थी प्रकाशन पुणे **2004** पृ . **8**
**6** . आवलगावकर रमेश, 'कथासारामृत', देवगिरी प्रकाशन शिरूर पृ . **171**
**7** . फडके वि . के ., 'भक्तलीलामृत', यशवंत प्रकाशन **1978**, पृ . **1**
**8** . ढेरे रा . चि ., 'संतांच्या चरित्रकथा', पुष्पक प्रकाशन पुणे **1967**, पृ . **75**

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org